**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, अंधेरी, मुंबई यांच्या न्यायालयात (न्यायालय क्र.६६)**

**जामिन अर्ज क्र. ६३४/२०२६**
**गुन्हा रजि.क्र. ८२१/२०२३**

## आदेश

१. आरोपी नितीन मदनलाल जैन यांनी प्रस्तुतचा अर्ज जामीन मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. सदरील अर्जाला अनुसरुन सरकारी वकील व तपासी अंमलदार यांनी त्यांचे विस्तृत म्हणणे दाखल केले. त्यांनी अर्ज फेटाळण्याची मागणी केली आहे.

२. सदरहू अर्जाला अनूषंगून मुळ केसचे अवलोकन केले. आरोपी यांच्या विरुध्द भारतीय दंड विधान कलम ४२०, ४०६ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. आरोपी विरुध्दच्या गुन्हयाचे स्वरुप गंभीर आहे. परंतु सदरहु केसमध्ये अदयाप आरोपीकडून कोणत्याही मुद्देमाल जप्त करण्यात आलेला नाही. तसेच सदरहू केस मध्ये अदयाप दोषारोपपत्र दाखल करण्यात आलेले नाही. त्यामुळे काही कडक अटी व शर्तीवर आरोपींची जामिनावर मुक्तता करणे आवश्यक ठरते.

**सबब आदेश खालिलप्रमाणे--**

१. आरोपी नितीन मदनलाल जैन यांची रूपये २५,०००/— (पंचवीस हजार रुपये) च्या वैयक्तीक जातमुचलका व पंचवीस हजार रुपयांचा सॉल्व्हन्सी सर्टीफिकेट असणा--या जामिनदाराद्वारे जामिनावर मुक्तता करण्यात यावी.

१२/०६/२०२६

२. आरोपी याला सॉल्व्हन्सी सर्टीफिकेट असणारा जामिनदार देता येणे शक्य नसेल तर आरोपी याने रूपये २५,०००/— (पंचवीस हजार रुपये) चा वैयक्तीक जातमुचलका व पंचवीस हजार रुपयाचा रोख जामिन सादर करावा व तो जामिन दिल्यानंतर आरोपीची जामिनावर मुक्तता करण्यात यावी.

३. आरोपी व जामिनदार यांनी त्यांच्या कायम रहिवासाचा पत्ता दर्शविणारे पुरावे म्हणजेच आधार कार्ड अगर लाईट बिल इत्यादी कागदपत्र जामिनाची पुर्तता करते वेळीस जामिनपत्रासोबत दाखल करावेत.

४. आरोपी यांनी दोषारोपत्र दाखल करेपर्यंत दर सोमवारी सकाळी ११.०० ते २.०० या वेळेत अंबोली पोलीस स्टेशन येथे हजर राहुन पोलीसांना तपासकामात सहकार्य करावे.

५. जामिनदार यांनी ते आरोपींना नियमित केस कामी हजर ठेवतील असे स्वतंत्र अंडरटेकींग जामिनपत्रासोबत सादर करावे.

६. आरोपीने साक्षीदारांवर दबाव टाकू नये असे आरोपींना निर्देशित करण्यात येत आहे.

दिनांक : ०९.०६.२०२६

(अ. अ. मेहेंदळे) 09/06/2026
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी
६६वे न्यायालय, अंधेरी, मुंबई.
प्रभारी ४४वे न्यायालय, अंधेरी, मुंबई.